नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १३० Issue - 130 | वार गुरुवार दि. २६ सप्टेंबर २०२४ Blow- Thursday Date 26 September 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# एन्काउंटरचा संपूर्ण घटनाक्रमच संशयाच्या भोवऱ्यात

## अक्षय शिंदे मृत्यूप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचे ताशेरे!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बदलापूर लैंगिक अत्याचारप्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काउंटरमध्ये मृत्यू झाला. हे एन्काउंटर आता वादग्रस्त ठरले असून कोर्टानेही यावरून ताशेरे ओढले आहेत. एन्काउंटरचा संपूर्ण घटनाक्रमच संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे.



एवढंच नव्हे तर हे एन्काउंटर असूच शकत नाही, असं मुंबई उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. याप्रकरणी आज सुनावणी झाली असून आता पुढची सुनावणी पुढच्या गुरुवारी होणार आहे. या सुनावणीत जखमी पोलिसाचे वैद्यकीय अहवाल, सीसीटीव्ही फुटेज, फॉरेन्सिक लॅबचा अहवाल आदी पुरावे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पोलीस वाहनातून आरोपीला घेऊन जात असताना चार पोलीस अधिकाऱ्यांची गरज काय होती? यासाठी अतिरिक्त माणसांचा वापर झाला असं वाटत नाही का? असा सवाल उच्च न्यायालयाने विचारला. तसंच, त्याने हातातून पिस्तुल खेचून घेतली तेव्हा चार पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला रोखायला हवं होतं. चार पोलिसांना तो आवरता आला नाही का? असाही प्रश्न न्यायालयाने विचारला.

अक्षयने तीन गोळ्या झाडल्या असं तुम्ही म्हणालात. एक गोळी पोलिसाला लागली. मग इतर दोन गोळ्या कुठे आहेत? आपण स्वसंरक्षणाकरता असा परिस्थिती पायावर किंवा हातावर गोळी मारतो. गोळी कुठे मारावी याचं प्रशिक्षण पोलिसांना दिलं जातं. अशाही प्रश्नांची सरबत्ती केली. त्यावर सरकारी वकिलांनी सांगितलं की, पोलिसांनी विचार केला नाही, त्यांनी घटनेवर तत्काळ प्रतिक्रिया दिली.

त्याने जेव्हा हातात पिस्तुल घेऊन कोणावर रोखली तेव्हा इतर अधिकाऱ्यांनी त्याला रोखलं का नाही. तो फार स्ट्राँग माणूस नव्हता. त्यामुळे हे स्वीकारणं कठीण आहे. हे एन्काऊंटर असू शकत नाही, असंही न्यायमूर्ती म्हणाले.

त्याने यापूर्वी कधी शस्त्र वापरली आहेत का? जर त्याने पिस्तुल लोड केली असं तुम्ही म्हणत असाल तर त्याने याआधी शस्त्र वापरली असतील, असंही न्यायमूर्तींनी विचारलं. त्यावर सरकारी वकील म्हणाले, त्याने पिस्तुल लोड केली नाही. झटापटीत पिस्तुल लोड झाली होती. त्याने याआधी कधीही शस्त्रे वापरली नाहीत.

गंभीर गुन्हा असलेल्या माणसाला घेऊन जात असताना एवढा निष्काळजीपणा का दाखवला. याबाबत नियमावली काय आहे? त्याच्या हाताला बेड्या होत्या का? असा सवालही न्यायमूर्तींनी विचारला. त्यावर सरकारी वकील वेनेगावकर म्हणाले, त्याच्या हाताला बेड्या होत्या. पण त्याने पाणी मागितलं.



# मराठा आणि ओबीसींचे आंदोलन, महाराष्ट्राला भुषणावह नाही : फडणवीस


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई : राज्यात मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले आहे. तर दुसरीकडे ओबीसी समाजाला आरक्षण मिळावे यासाठी उपोषण सुरू आहे. राज्यात समाजबांधवानी आरक्षणाच्या मुद्दावर आमने सामने येत उपोषणाचा मार्ग स्विकारल्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खेद व्यक्त केला आहे. मराठा मावळे आमने-सामने आले आहेत. ही बाब परंपरा असणाऱ्या महाराष्ट्राला भुषणावह नाही असे मतही फडणवीस यांनी व्यक्त केले. आरक्षणांच्या प्रश्नी सरकार प्रयत्नशील असून कायद्यांच्या चौकटीत बसणारे आणि न्यायलयात टिकणारे आरक्षण देण्यासाठी सरकार प्रयत्न करीत असल्याचे फडणवीस म्हणाले. वाशी येथील एपीएमसी बाजारांच्या कांदा बटाटा मार्केट यार्डात माथाडीचे नेते स्वर्गीय अण्णसाहेब पाटील यांच्या जयंतीच्या निमित्ताने अभिवादन कार्यक्रम तसेच समाजभुषण पुरस्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर आमदार प्रवीण दरेकर, माथडीचे नेते शंशिकात शिंदे, स्वर्गीय अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार गणेश नाईक आदि मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित माथडी कामगारांना मार्गदर्शन करताना देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक आणि वडाळा येथील माथाडी कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी येत्या पंधरा दिवसात राज्याचे पणनमंत्री आणि कामगार मंत्री यांची बैठक घेऊन तिढा सोडवणार असल्याचे आश्वासित केले. माथाडीच्या घरांसाठी केलेल्या मागणीवर आगामी कालावधीत प्रधानमंत्री आवास योजनेतून नियमारुप बाबी तपासून मुख्यंमत्र्याच्या मार्गदर्शनाखाली घरांची मागणी पुर्ण करणार असल्याचे फडणवीस म्हणाले. मराठा आरक्षणाविषयी मत मांडताना स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी दिलेल्या बलिदांनाचे स्मरण करत त्यांना आदरांजली अर्पण केली. त्याच्यामुळे मराठा समाजाची चळवळ उभी राहिली असून केंद्र व राज्य सरकार मराठा समाजाला न्याय देईल त्यांच्या विकासासाठी स्र्वागीण प्रयत्न करेल असेही फडणवीस म्हणाले.

# सोलापूर विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून लायसन्स मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर (जिमाका) : नागरी विमान वाहतूक महासंचालनालय(DGC) चे दिनांक ११ व १२ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने विमानतळाची पाहणी व तपासणी करून गेले होते. यामध्ये विमानतळाचे नियमन आणि सुरक्षा निरीक्षण प्रणाली द्वारे सुरक्षितता आणि हवाई सक्षमता तपासणी डीजीसीए कडून करण्यात आलेली होती. विमान वाहतूक सुरू करण्याच्या अनुषंगाने असलेली सर्व मानके सोलापूर विमानतळ प्राधिकरण कडून पूर्ण करण्यात आलेली असल्यामुळे आज डीजीसीए कडून सोलापूर विमानतळावरून विमान उडणे व उतरण्याचे परवाना (लायसन्स) मंजूर झालेले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

तत्पूर्वी ब्युरो ऑफ सिविल एव्हिजन सिक्युरिटी (नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो) च्या अधिकाऱ्यांनी होटगी रोड सोलापूर विमानतळाची सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विविध पातळीवर अत्यंत काटेकोरपणे तपासणी केली. विमानतळ प्राधिकरण कडून सुरक्षेच्या त्रुटींची पूर्तता केल्यानंतर पुन्हा ब्युरो ऑफ सिविल एव्हिएशन सिक्युरिटी चे अधिकारी तपासणीसाठी आलेले होते. त्यांची तपासणी झाल्यानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची टीम विमानतळाच्या विविध सुरक्षा मानके याबाबत तपासणी करण्यासाठी आली होती. तपासण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डीजीसीए कडून सोलापूर विमानतळाला आज विमान लँड होणे को टेकऑफ करण्याची लायसन्स प्राप्त झालेले आहे. त्यामुळे सोलापूर विमानतळ येथून विमानसेवा सुरू होण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

## हवामान विभागाचा मुंबईला रेड अलर्ट; शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई शहर आणि उपनगरात बुधवारी सायंकाळपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे लोकल सेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळे सीएसएमटीसह विविध रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची गर्दी बघायला मिळत आहे. कार्यालयीन कामे संपून घरी परतणाऱ्या नोकरदार वर्गाचे प्रचंड हाल होत आहेत. महत्त्वाचे म्हणजे हवामान विभागाने उद्या सकाळी ८.३० पर्यंत मुंबईत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे उद्या मुंबईतील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागाने मुंबई महानगराला उद्या (दिनांक २६ सप्टेंबर २०२४) सकाळी ८.३० पर्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला आहे. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबईतील सर्व शाळा, महाविद्यालयांना उद्या गुरूवार २६ सप्टेंबर २०२४ रोजी सुटी जाहीर करण्यात येत आहे, अशी माहिती मनपा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. तसेच आवश्यकता असेल तरच मुंबईकरांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

## थोडक्यात

### गर्भपाताच्या घरीच गोळ्या दिल्याने अतिरक्तस्राव होऊन महिलेचा मृत्यू

इंदापूर प्रतिनिधी /अतुल सोनकांबळे

इंदापूर : पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात वडापुरी गावातील गर्भवती महिलेचा घरीच गर्भपात केल्याने मृत्यू



झाला असुन मयत महिलेचे नाव ऋतुजा राहुल धोत्रे असे आहे यांना घरीच गर्भपाताच्या गोळ्या दिल्या त्यामुळे महिलेचा झाला घरीच मृत्यू झाला. महिलेच्या नातेवाईकांनी त्यावर आक्षेप घेतला आणि इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असुन रात्री उशिरा इंदापूर पोलीस ठाण्यात मयत महिलेच्या नातेवाईकांनी गुन्हा दाखल केला असून नातेवाईक पोलीस ठाण्यात ठीया मांडुन बसले होते त्यानंतर पोलिसांकडून महिलेच्या पती राहुल धोत्रे व सासू-सासरे यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### गुजरातमध्ये भीषण अपघात; सात जण ठार

अहमदाबाद : गुजरातच्या साबरकांठा जिल्ह्यात भीषण अपघात झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. या अपघातात सात जणांचा मृत्यू झाला आहे. श्यामलाजींचं दर्शन करून परतणाऱ्या भाविकांच्या एका कारने ट्रकला धडक दिली. कारमधील सात प्रवासी मृत्यूमुखी पडले असून एक जण गंभीररित्या जखमी झाला आहे. त्याला जवळच्या रुग्णालयात नेलं असून त्याच्यावर उपचार चालू आहेत. धडकेनंतर ही कार ट्रकमध्ये अडकली होती. त्यामुळे कटरच्या सहाय्याने कार कापून त्यामधील प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं.

# आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोलापूर विमानतळाचे दूरदृश्य प्रणाली द्वारे होणार उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : सोलापूर विमानतळाचे उद्घाटन दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे येथून दूरदृश्य प्रणाली द्वारे होणार आहे. तत्पूर्वी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विमानतळावर नव्याने करण्यात आलेल्या कामांची पाहणी करण्यात आली. तसेच प्रधानमंत्री महोदयाच्या हस्ते होणाऱ्या उद्घाटनाच्या अनुषंगाने विमानतळ प्राधिकरण प्रशासनाने केलेल्या तयारीची पाहणी करून आढावा घेतला.

यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदूने, विमानतळ प्राधिकरणचे बनोथ चांप्ला त्यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.




यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विमानतळावरील सर्व कामकाजाची पाहणी करून माननीय प्रधानमंत्री महोदय यांच्या हस्ते पुणे येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे होणाऱ्या उद्घाटन समारंभाच्या अनुषंगाने विमानतळ प्राधिकरणाने केलेल्या तयारीचा आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.

# जम्मू-काश्मीरमध्ये ५५ टक्के मतदान

नवी दिल्ली : जम्मू आणि काश्मीर विधानसभेसाठी दुसऱ्या टप्प्यात बुधवारी पाच वाजेपर्यंत ५६ टक्के मतदान झाले. सहा जिल्ह्यांतील २६ मतदारसंघांत २३९ उमेदवार रिंगणात आहेत. पाच वाजेपर्यंत जम्मू विभागातील श्री माता वैष्णो देवी मतदारसंघात सर्वाधिक ७५.२९ टक्के मतदान झाले. पाठोपाठ पूंछ हवेली मतदारसंघात ७२.७१, गुलबर्गमध्ये ७२.१९ टक्के तर सुरनकोटमध्ये ७२.१८ टक्के मतदारांनी हक्क बजावला.



काश्मीर खोऱ्यातील १५ मतदारसंघांपैकी खानासाहेबमध्ये सर्वाधिक ६७ टक्के मतदान झाले. हब्बाकडल मतदारसंघात सर्वात कमी १५.८० टक्के मतदान झाले. तिसऱ्या टप्प्यात १ ऑक्टोबरला मतदान होईल. तर हरियाणासह जम्मू व काश्मीर विधानसभा निवडणुकीची मतमोजणी ८ ऑक्टोबरला होईल. दरम्यान, काश्मीरमधील विधानसभा निवडणूक प्रक्रियेच्या पाहणीसाठी अमेरिका, नॉर्वे, सिंगापूर आदींसह १६ देशांमधील निरीक्षक उपस्थित आहेत. त्यांनी बडगम जिल्ह्यातील ओंपोरा विभागात भेट दिली. निवडणूक अधिकारी अक्षय लाब्रो यांनी निवडणूक प्रक्रियेची माहिती दिली. नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी केंद्र सरकारवर या मुद्द्यावर टीका केली आहे. ही निवडणूक देशाचा अंतर्गत विषय असताना परदेशी प्रतिनिधींना आमंत्रण देण्याचे कारण काय? असा सवाल त्यांनी केला. परदेशी नागरिकांना तपासणी कशासाठी करून द्यायची? अशी विचारणा अब्दुल्लांनी केली.

जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा देण्यासाठी केंद्र सरकारवर दबाव आणू असे आश्वासन विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोपोर येथील प्रचारसभेत दिले. राज्याचा दर्जा हिरावून केंद्रशासित प्रदेश निर्माण करणे हा येथील जनतेवर अन्याय आहे, असेही ते म्हणाले.

**शनिवारपासून जोर कमी होणार** — **हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. के. सानप यांनी दिली माहिती**

# महाराष्ट्रात पावसाचा जोर आणखी दोन दिवस राहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : उत्तर कोकणपासून दक्षिण बांगलादेशपर्यंत हवेच्या कमी दाबाचा आस निर्माण झाला आहे. कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता कमी होऊन छत्तीसगडवर हवेची चक्रीय स्थिती तयार झाली आहे. त्यामुळे पुढील दोन दिवस उत्तर मध्य महाराष्ट्र, उत्तर किनारपट्टी, उत्तर महाराष्ट्रात पावसाचा जोर राहणार आहे. पालघर, नाशिकमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तर कोकणापासून दक्षिण बांगलादेशपर्यंत हवेच्या कमी दाबाचा आस निर्माण झाला आहे. मंगळवारी (२५ सप्टेंबर) ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीनजीक तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता कमी होऊन छत्तीसगडवर हवेच्या वरच्या थरात वाऱ्याची चक्रीय स्थिती तयार झाली आहे. ही स्थिती कमी दाबाच्या आसावर आहे. त्यामुळे उत्तर मध्य महाराष्ट्र, उत्तर कोकण आणि उत्तर महाराष्ट्रात पुढील दोन दिवस मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने उत्तर महाराष्ट्र, उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्रात वादळी वारे, मेघगर्जनेसह मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.

**पावसाचा जोर आणखी दोन दिवस राहील. उत्तर महाराष्ट्र, नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर अशा दहा जिल्ह्यांत शनिवारपासून (२८ सप्टेंबर) पावसाचा जोर काहीसा कमी होण्याची शक्यता आहे, अशी माहिती निवृत्त हवामान शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.**

राजस्थान, कच्छमधून (गुजरात) सुरू झालेला मोसमी पावसाचा परतीचा प्रवास बुधवारी थांबला. बुधवारी मोसमी पावसाने कुठूनही माघार घेतली नाही. छत्तीसगडवर असलेली हवेची चक्रीय स्थिती आणि बंगालच्या उपसागरातून आलेल्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे परतीचा पाऊस काही काळ रेंगाळण्याची शक्यता आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र, उत्तर कोकण आणि उत्तर महाराष्ट्रात पुढील दोन दिवस पावसाचा जोर राहील. शनिवारनंतर पावसाचा जोर कमी होण्याचा अंदाज आहे, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. के. सानप यांनी दिली.

राज्यात सध्या सर्वदूर होत



असलेला पाऊस परतीचा पाऊस नाही. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यभरात पाऊस होत आहे. मोसमी वाऱ्यांनी गुजरात आणि राजस्थानमधून परतीचा प्रवास सोमवारपासून (२३ सप्टेंबर) सुरू केला आहे. बुधवारी (२५ सप्टेंबर) मोसमी वाऱ्याचा परतीचा प्रवास थांबला आहे. राज्यातून मोसमी वारे माघारी जात असताना किंवा मोसमी वाऱ्याचा राज्यातून परतीचा प्रवास सुरू असताना पडणाऱ्या पावसाला परतीचा पाऊस म्हणता येईल, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. के. सानप यांनी दिली.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

गुरुवार दि. २६ सप्टेंबर २०२४


## संपादकीय....

## कोर्टाचे ताशेरे

बदलापूर लैंगिक अत्याचारप्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काउंटरमध्ये मृत्यू झाला. हे एन्काउंटर आता वादग्रस्त ठरले असून कोर्टानेही यावरून ताशेरे ओढले आहेत. एन्काउंटरचा संपूर्ण घटनाक्रमच संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. एवढंच नव्हे तर हे एन्काउंटर असूच शकत नाही, असं मुंबई उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. याप्रकरणी सुनावणी झाली असून आता पुढची सुनावणी पुढच्या गुरुवारी होणार आहे. या सुनावणीत जखमी पोलिसाचे वैद्यकीय अहवाल, सीसीटीव्ही फुटेज, फॉरेन्सिक लॅबचा अहवाल आदी पुरावे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पोलीस वाहनातून आरोपीला घेऊन जात असताना चार पोलीस अधिकाऱ्यांची गरज काय होती? यासाठी अतिरिक्त माणसांचा वापर झाला असं वाटत नाही का? असा सवाल उच्च न्यायालयाने विचारला. तसंच, त्याने हातातून पिस्तुल खेचून घेतली तेव्हा चार पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला रोखायला हवं होतं. चार पोलिसांना तो आवरता आला नाही का? असाही प्रश्न न्यायालयाने विचारला. अक्षयने तीन गोळ्या झाडल्या असं तुम्ही म्हणालात. एक गोळी पोलिसाला लागली. मग इतर दोन गोळ्या कुठे आहेत? आपण स्वसंरक्षणाकरता असा परिस्थिती पायावर किंवा हातावर गोळी मारतो. गोळी कुठे मारावी याचं प्रशिक्षण पोलिसांना दिलं जातं. अशाही प्रश्नांची सरबत्ती केली. त्यावर सरकारी वकिलांनी सांगितलं की, पोलिसांनी विचार केला नाही, त्यांनी घटनेवर तत्काळ प्रतिक्रिया दिली. त्याने जेव्हा हातात पिस्तुल घेऊन कोणावर रोखली तेव्हा इतर अधिकाऱ्यांनी त्याला रोखलं का नाही. तो फार स्ट्राँग माणूस नव्हता. त्यामुळे हे स्वीकारणं कठीण आहे. हे एन्काऊंटर असू शकत नाही, असंही न्यायमूर्ती म्हणाले. त्याने यापूर्वी कधी शस्त्र वापरली आहेत का? जर त्याने पिस्तुल लोड केली असं तुम्ही म्हणत असाल तर त्याने याआधी शस्त्र वापरली असतील, असंही न्यायमूर्तींनी विचारलं. त्यावर सरकारी वकील म्हणाले, त्याने पिस्तुल लोड केली नाही. झटापटीत पिस्तुल लोड झाली होती. त्याने याआधी कधीही शस्त्रे वापरली नाहीत. गंभीर गुन्हा असलेल्या माणसाला घेऊन जात असताना एवढा निष्काळजीपणा का दाखवला. याबाबत नियमावली काय आहे? त्याच्या हाताला बेड्या होत्या का? असा सवालही न्यायमूर्तींनी विचारला. त्यावर सरकारी वकील वेनेगावकर म्हणाले, त्याच्या हाताला बेड्या होत्या. पण त्याने पाणी मागितलं.

# ...जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की, शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा आहे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मित्र हो,

फुले शाहू आंबेडकराईट आंदोलनाच्या अनुषंगाने ऐतिहासिक दृष्टीने विचार करता या महिन्यातील २४ सप्टेंबर १८७३ ला राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेले सत्यशोधक समाज पक्ष आणि २४ सप्टेंबर १९३२ ला द्वितीय गोलमेज परिषदेत प्रधानमंत्री रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केल्याप्रमाणे अस्पृश्यांना मिळालेले स्वतंत्र मतदारसंघ गांधींच्या आमरण उपोषणामुळे झालेल्या पुणे करारान्वये नाकारण्यात आले म्हणून पुणे करार या दोन बाबींचा प्रामुख्याने विचार केला जातो. गोलमेज परिषदेत गांधींनी माझ्या मनाला डॉ. आंबेडकरांचे म्हणणे पटते पण बुद्धीला पटत नाही. असे विरोधाभासी विधान केले होते. हे सर्व महत्त्वपूर्ण आहेच तरी आपले लक्ष अजून एका प्रासंगिक विषयाकडे केंद्रित करू इच्छितो ते असे की, २४ सप्टेंबर १९४४ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मद्रासला असताना सकाळ, दुपार व संध्याकाळ अशा तीन वेगवेगळ्या समुदायाच्या लोकांना सभेत मार्गदर्शन केले आहे. ज्यात सकाळी १० वाजता रॅशनल सोसायटीच्या विद्यमाने श्री. एस. रामनाथ यांच्या अध्यक्षतेखाली प्रभात टॉकीज येथे आयोजित सभेत बोलताना आपल्या धार्मिक, सामाजिक व राजकीय आयुष्याचा पाया बुद्धिवाद हाच असला पाहिजे असे प्रतिपादन केले होते. तसेच दुपारी दोन वाजता मद्रास च्या कोन्नेमर हॉटेल मध्ये मार्गदर्शन करताना दक्षिण भारतात १९२० ते ३७ च्या काळात ब्राह्मणेत्तरांचा पक्ष जस्टिस पार्टी अधिकारांवर असतानासुद्धा पुढे १९३७ च्या निवडणुकीत या पक्षाला हार का पत्करावी लागली? या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, सत्तेवर असूनही ब्राह्मणेतर पक्षाला ब्राह्मण्य नष्ट करता आले नाही. त्यामुळे ही नामुष्की ओढवली आहे.

२४ सप्टेंबर १९४४ ला सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या सभेत प्रतिपादन केले होते की, जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की, शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट व आकांक्षा होय. जेणेकरून दररोज आपणांस याची आठवण होत राहील असा महत्त्वाचा संदेश दिला होता.

तसेच २४ सप्टेंबर १९४४ ला मद्रास इलाखा शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनच्या वतीने रावबहादूर एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची जाहीर सभा संपन्न झाली होती. या सभेत मद्रास आणि द्रविड वर्कर्स असोसिएशन, साऊथ इंडियन बुद्धिष्ट असोसिएशन, शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन ऑफ दि सिव्हिल एन्ड मिलिटरी स्टेशन बंगलोर, मद्रास शेड्युल्ड कास्ट्स स्टुडंट्स असोसिएशन व इतर अनेक संस्था मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानपत्रे देण्यात आली होती. एका तरुणाने बुद्धाचे सुंदर रंगीत चित्र भेट दिले होते.



या सभेच्या पूर्वी घडलेल्या घडामोडीच्या अनुषंगाने नामदार श्रीनिवास शास्त्री यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोणत्याही आंतरराष्ट्रीय परिषदेत भाग घ्यायला संधी मिळू नये, याची हिंदी जनतेने काळजी घेतली पाहिजे असे म्हटले होते. त्याचा परामर्श घेताना नामदार श्रीनिवास शास्त्री हे ब्रिटिश सरकारच्या मांडीवरील कुत्र्यासारखे असल्याची जाणीव करून दिली होती. पुढे बाबासाहेब म्हणाले की, ज्या गांधींना काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्यासाठी १९३२ च्या द्वितीय गोलमेज परिषदेत पाठविले होते. ते मात्र केवळ सायमन कमिशनच्या शिफारशीवर संतुष्ट झाले. त्यावेळी पार्लमेंटने सायमन कमिशनच्या शिफारशी मंजूर करून घेण्यासाठी पार्लमेंटमधील कॉंझर्वेटीव्ह, लेबर व लिबरल या तीन पक्षाचे कमिशन नेमण्यात आले होते. ज्यात गांधींचे समर्थन मिळताच सर सॅम्युअल होअर यांनी सप्रू, आंबेडकर आणि जिन्ना यांना जास्त महत्त्व न देता सायमन कमिशनप्रमाणे कायदा करावा असे मत व्यक्त केले होते. त्या विरोधात सप्रू, आंबेडकर व जिन्ना यांनी आवाज उठविला होता. परिणामी ब्रिटिश मंत्रिमंडळाला परिषदेतील प्रतिनिधींची मते अजमावण्यासाठी लार्ड चँसेलर यांचे अध्यक्षतेखाली मुख्य प्रधान, भारतमंत्री व इतर सभासदांची कॅबिनेट कमिटी नेमणे भाग पडले होते.

संस्थानिकांतील प्रतिनिधींच्या प्रश्नावर डॉ. आंबेडकर लढत असताना गांधींनी मात्र संस्थानिकांना प्रतिनिधींची पसंती करण्यास मान्यता देऊन संस्थानिकांपुढे लोटांगण घातले होते. ज्यात डॉ. आंबेडकरांनी हे स्पष्ट केले होते की, हिंदुस्थानातील राजकारणी व संस्थानिकांतील राजकारणी हे एकत्र असले तरी त्यांची विभागणी होऊन १५० वर्षे झाल्याने तसेच त्यांना मिळालेले राजकीय शिक्षण भिन्न असल्याने त्यांची भेसळ करू नये.

ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर पहिल्या गोलमेज परिषदेत गांधीं अनुपस्थित होते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित असल्यामुळे त्यात काय घडले होते? याची त्यांना जाणीव होती. त्याची जाणीव गांधींना सुद्धा व्हावी म्हणून डॉ. आंबेडकरांनी ताप आल्याचे निमित्त करून परिषदेचे अध्यक्ष लार्ड चँसेलर यांना विनंती करून प्रथम बोलण्याची परवानगी मागितली होती. त्यामुळे दीड तास भाषण देऊन आंबेडकर बाहेर पडले कारण त्यांनी पूर्वीच ताप आल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे पुढील कार्यवाहीत नेमके काय घडले? हे माहीत नसल्याने डॉ. आंबेडकर परिषदेच्या अहवालाची आतुरतेने वाट पाहत असताना बरोबर मध्यरात्रीला परिषदेचा अहवाल हाती पडला. ज्यात गांधींनी म्हटलेले पहिलेच वाक्य नमूद केले होते ते असे की, माझ्या मनाला डॉ. आंबेडकरांचे म्हणणे पटते पण बुद्धिला पटत नाही. अर्थात गांधींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या म्हणण्याला विरोध केला होता. त्यामुळे दुसऱ्या दिवशी परिषदेत डॉ. आंबेडकरांनी गांधींना तीन प्रश्न विचारले होते. त्यापैकी पहिला प्रश्न म्हणजे प्रजेचे प्रतिनिधी संस्थानिकानीच पसंत करावे असे स्पष्ट करण्यासाठी काँग्रेसने त्यांना आज्ञा केली होती, अधिकार दिला होता काय? दुसरा प्रश्न असा होता की, ज्या कॉन्झरव्हेटीव्ह पार्टीला अप्रत्यक्ष निवडणूका व्हाव्यात अशी अपेक्षा होती, त्याला सर्वांचा विरोध असताना गांधींनी विरोध न करणे हे तात्विक दृष्टया काँग्रेसने मिसेस अँनी बेझंटचे होमरूल बील याच तत्त्वांवर फेटाळले होते. ही गोष्ट खरी नव्हे काय? सदरील प्रश्नावर गांधींनी कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. तेव्हा बाबासाहेब आंबेडकरांनी आपण देशाला बुडविण्याच्या पापाचे भागीदार नसल्याचे स्पष्ट केले होते. तसेच हिंदू महासभेने मागितलेल्या स्वराज्याला पाठिंबा देताना आम्हाला आमच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी खास हक्क द्या, अशी न्याय अपेक्षा व्यक्त केली होती. जी अपेक्षा आयर्लंडचे एडवर्ड कार्सनच्या भूमिकेपेक्षा उच्च कोटींची असल्याचे नमूद केले होते. त्यात सामोपचाराने प्रश्न सोडविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी हिंदू बांधवांकडून अपेक्षा व्यक्त केली होती की, आतातरी त्यांनी मनोवृत्ती बदलली पाहिजे कारण हजारो वर्षांपासून सुरू असलेल्या ब्राह्मणांच्या जुलुमाला विसरून भविष्यकाळाच्या आश्वासनांवर विसंबून केवळ खास हक्क, विशिष्ट तरतूदी मागत आहोत.

१९३२ च्या द्वितीय गोलमेज परिषदेत हिंदूंनी अस्पृश्यांचे स्वतंत्र अस्तित्व अमान्य केले होते कारण त्यावेळी ब्रिटिश सरकार अस्पृश्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी कायदेमंडळात घेणार होते. त्यामुळे अस्पृश्य हिंदू पासून वेगळे झाल्यास हिंदूंचे अस्तित्व धोक्यात येणार होते. १५ जुलै १९४४ च्या पत्रान्वये व्हाईसरॉय लार्ड वाव्हेल यांनी स्पष्ट केले होते की, दुसऱ्या महायुद्धानंतर या देशाला स्वातंत्र्य देताना देशातील सर्व अस्पृश्यांसह सर्व समान घटकांना सामावून घेतले जाईल अशाप्रकारे सायमन कमिशनच्या शिफारशी प्रमाणे अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ देण्याचे मान्य करण्यात आले होते कारण अस्पृश्यांचे स्वतंत्र अस्तित्व सरकारला मान्य होते. या सर्व प्रकारच्या घडामोडीत गांधींनी जिन्ना बरोबर तडजोड करताना त्यांच्या सर्व १४ मागण्या मंजूर केल्या होत्या. त्या केवळ एका विशिष्ट अटींवर म्हणजे जिन्ना यांनी अस्पृश्यांना म्हणजे आंबेडकरांना सहकार्य करू नये. अर्थात, जातीय प्रश्न क्षितिजावर दिसू लागल्यापासून आपल्या सार्वजनिक आयुष्यात गांधींनी जर काही केले असेल तर ते अस्पृश्यांकडे दूर्लक्ष करने हेच होय. असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निष्कर्ष काढला होता. परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट व आकांक्षा आहे. हे आपल्या मनात बिंबवले पाहिजे. करिता जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा जेणेकरून आपणांला दररोज त्याची आठवण होत राहील. करिता आपले हक्क अधिकार पदरात पाडून घेण्यासाठी समाजाची एकजूट करून संघटीत झाले पाहिजे. हे ऐतिहासिक तथ्य समजून घेऊन समाजाला समजावून सांगण्याची नितांत आवश्यकता असल्याची जाणीव असल्याने वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तरी विधायिका, कार्यपालिका, न्यायपालिका व प्रसार माध्यमांसह लोकशाहीच्या सर्व स्तंभावर संवैधानिक समूहांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व प्राप्त करून घेण्यासाठी लढा दिला तरच शासनकर्ती जमात बनने शक्य होईल. कुणी मला असाही प्रश्न विचारतील की, आपण आपल्या घराच्या भिंतीवर सदरील संदेश लिहिला आहे काय? तर यावर माझे उत्तर आहे की, होय! मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वाहक अनुयायी असल्याने आधी पालन करा आणि मग सांगावे, या उक्तीप्रमाणे सदरील संदेश माझ्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवला आहे. ज्याचा मला सार्थ अभिमान आहे. ते मला दररोज आठवण देत असल्याने दिवसाची दिनचर्याच बदलून टाकते तरी आपण सुद्धा सदरील संदेश आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करतो.



**लेखक : बी. बी. मेश्राम,**
संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना)
संपर्क : ९४२१६७८६२८

## श्री क्षेत्र कानिफनाथ गड येथे मोफत निसर्गोपचार व योग शिबीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट, समस्त ग्रामस्थ बोपगांव आणि राष्टीय निसरगोपचार संस्था,पुणे यांच्या संयुक्त विध्यमाने गुरुवार दि. २६/९/२०२४ रोजी श्री क्षेत्र कानिफनाथ गड येथे पंचक्रोशीतील सर्व भाविकांसाठी मोफत निसरगोपचार व योग शिबीर आयोजित केले आहे.सर्व नागरिकांना मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे देवस्थान ट्रस्ट च्या वतीने आव्हान करण्यात आले आहे. सकाळी ठीक १०. वा. शिबीर आयोजित केले आहे. असे आव्हान ट्रस्ट चे अध्येक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, व सर्व संचालक मंडळ यांनी केले आहे.



## चपळगाव येथे आयपीएस तेजस्वी सातपुते यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चपळगाव/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव येथे पुण्याच्या पोलीस उपायुक्त आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांचा वाढदिवस चपळगावच्या सरपंच वर्षाताई भंडारकवठे यांच्या अध्यक्षतेखाली व उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार वळसंग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल सनगले सरकारी वकील बेसकर सर यांच्या उपस्थितीत केक कापून साजरा करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले राजमाता जिजाऊ छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.

याप्रसंगी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले अशोक घोगरे सर यांचा व ग्रामसेवक पदी निवड झाल्याबद्दल समर्थ हरणे यांचा तर तंटामुक्त अध्यक्षपदी निवड झालेले कल्लाप्पा बडूरे यांचा सन्मान शिवम्मा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आला याप्रसंगी ग्रामसेवक सोमनाथ कणगी जि, प,मुख्याध्यापक सतीश वाले,शिवम्मा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तमा भाऊ गजधने यांनी सदर कार्यक्रमाचे नियोजन केले होते

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण तसेच शिकाऊ उमेदवार योजना मेळाव्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका)-: मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे व शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत मेळाव्याचे आयोजन औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर येथे केले आहे.आय. टी. आय. उत्तीर्ण तसेच १२ वी पास, डिप्लोमा, पदवीधर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांसाठी सदर मेळाव्याचे आयोजन २७ सप्टेंबर रोजी १० वाजता केलेले आहे. जिल्हयातील सर्व इच्छुक व प्रशिक्षणार्थी यांनी मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे प्राचार्य यांनी केलेले आहे.

# सोलापूर जिल्हयातील विधानसभा मतदार संघनिहाय अंतिम मतदार यादीमध्ये नांवे असलेबाबत व मतदान केंद्रातील बदलाची खात्री करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : नागरीकांना आवाहन करण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत्त विशेष पुनरिक्षण घोषीत झालेला आहे. त्यानुसार दि. ३० ऑगस्ट, २०२४ रोजी अंतिम मतदार यादी सर्व मतदान केंद्रावर, तहसिल कार्यालय, तसेच जिल्हा निवडणूक कार्यालय व ु.लशे.ारहरीरिहींर.सीं. ळप या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच मतदान केंद्राच्या नवीन, स्थलांतरीत, नावात बदलाबाबत हीींिः//ाश्ररीींं.सीं. ळप/शप/शश्रशलींळेप-लीरपलह/ीीं या वेबसाईटवर प्रसिध्दी देण्यात आलेली आहे, सोलापूर जिल्ह्यात नव्याने एकूण १२४, नावात बदल ६४, ठिकाण बदलात १५१ अरो एकूण-३७२३ मतदान केंद्र घोषित झालेली आहे, यावी व खालील बाबींबाबत नागरीकांनी नोंद घ्यावी.

मतदारानी आपली नांवे मतदार यादीत आहे किंवा कसे याबाबत मतदारांनी खात्री करुन घ्यावी, तसेच चार अर्हता दिनांकावर १८ वर्ष पूर्ण झालेल्या व त्यावरील सर्व नागरिकांनी आपले नांव मतदार यादी फॉर्म ६ मरुन नांव नोंदणी करावी.

ज्या मतदान केंद्रावर, एकाच कुटुंबातील मतदार यादीतील नांवे इतर मतदान केंद्रात विखुरलेले असल्यास त्यांनी त्या मतदान केंद्रावर नांव आणण्यासाठी फॉर्म ८ भरावेत, त्यामध्ये मतदान केंद्रास नव्याने जो अनुक्रमांक देण्यात आलेला आहे तो अचूक पध्दतीने फॉर्ममध्ये भरण्यात यावा. त्यासाठी हीींिः//ाश्ररीीं.सीं. ळप/शप/शश्रशलींळेप-लीरपलह/ या वेबसाईटवर प्रसिध्दी केलेल्या मतदान केंदाच्या यादीचा आधार घेण्यात यावा.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ व्या मतदानांदिवशी ज्या मतदारांची नांवे मतदार यादीत आढळून आलेली नाहीत अथवा वगळलेली गेलेली असल्याने ज्या मतदारांना मतदान करता आले नाही, अशा मतदारांची पडताळणी करण्यात आली असून अशा मतदारांकडून फॉर्म नं. ६ मरुन घेऊन त्यांची नांचे नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत. तरी देखील अद्यापही कोणत्या मतदारास आपले नांव मतदार यादीत नाही असे वाटत असेल तर त्यांनी आपआपल्या विधानसभा मतदारसंघामधील निवडणूक शाखेशी (तहसिल कार्यालय) संपर्क साधून नांव आहे अगर कसे याची खात्री करुन नांव नसल्यास फॉर्म नमुना क्र. ६ भरुन द्यावा.

सोलापूर जिल्हयात एका मतदान केंद्रावर जास्तीत जास्त १३५० मतदार संख्या ठेवणेबाबत मा. भारत निवडणूक आयोगाकडून निर्देश प्राप्त झाल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करुन खालीलप्रमाणे मतदार यांचे लगतच्या इतर मतदान केंद्रात नावे स्थलांतरीत करण्यात आलेली आहे. व अशी १२४ नवीन मतदान केंद्रे करण्यात आलेली आहेत याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे-

विधानसभा मतदार संघाचे क्रमांक व नांव - २४४ करमाळा - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे -३४२ -,प्रस्तावित नवीन मतदान केंद्र ५, ठिकाणात बदल १६ , विलिनीकरण ९ , नावात बदल ० , एकुण मतदान केंद्रे ३४७.


२४५ माढा - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे -३४१ , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र १४ , ठिकाणात बदल १८ , विलिनीकरण २ , नावात बदल १४ , एकुण मतदान केंद्रे ३५५ ,

२४६ बार्शी - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे ३२९ , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र ४ , ठिकाणात बदल ० , विलिनीकरण १४ , नावात बदल ० , एकुण मतदान केंद्रे ३३३

२४७ मोहोळ - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे ३३० , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र ६ , ठिकाणात बदल १८ , विलिनीकरण ११ , नावात बदल २६ , एकुण मतदान केंद्रे ३३६

२४८ सोलापूर शहर - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे २७८ , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र ११ , ठिकाणात बदल २५ , विलिनीकरण १९ , नावात बदल १० , एकुण मतदान केंद्रे २८९

२४९ सोलापूर मध्य. - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे २९० , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र १४ , ठिकाणात बदल २० , विलिनीकरण २७ , नावात बदल ० , एकुण मतदान केंद्रे ३०४



२५० अक्कलकोट - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे ३६९ , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र २१ , ठिकाणात बदल ५ , विलिनीकरण १५ , नावात बदल ० , एकुण मतदान केंद्रे ३९०

२५१ दक्षिण सोलापूर - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे ३४६ , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र १६ , ठिकाणात बदल २ , विलिनीकरण ४३ , नावात बदल ० , एकुण मतदान केंद्रे ३६२

२५२ पंढरपूर - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे ३३७ , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र २० , ठिकाणात बदल २२ , विलिनीकरण ५० , नावात बदल ८ , एकुण मतदान केंद्रे ३५७

२५३ सांगोला - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे २९९ , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र ६ , ठिकाणात बदल २२ , विलिनीकरण १७ , नावात बदल ० , एकुण मतदान केंद्रे ३०५

२५४ माळशिरस - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे ३३८ , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र ७ , ठिकाणात बदल ३ , विलिनीकरण १९ , नावात बदल ६ , एकुण मतदान केंद्रे ३४५

एकुण - पूर्वी असलेली मूळ मतदान केंद्रे ३५९९ , प्रस्तावित नवीन मतदान केंद्र १२४ , ठिकाणात बदल १५१ , विलिनीकरण २२६ , नावात बदल ६४ , एकुण मतदान केंद्रे ३७२३

वरीलप्रमाणे मतदान केंद्रामध्ये बदल झालेले असून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सोलापूर कुमार आशीर्वाद, यांनी जिल्हयातील सर्व नागरिकांना जाहीर आवाहन केले आहे की, त्यांनी आपली व आपल्या कुटुंबातील सर्व पात्र मतदारांची नांवे वरीलप्रमाणे बदल झालेल्या मतदान केंद्रावरील मतदार यादीमध्ये असलेबाबत खात्री करावी व बदल झालेल्या ठिकाणांची नोंद घ्यावी तसेच कुटुंबातील ज्या पात्र मतदारांची नोंदणी अद्यापही झालेली नाही, अशा सर्व नव मतदारांची नांवे नोंदणी करून घ्यावी.

तसेच, सर्व नागरीकांनी आगामी सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आपली नांवे, फोटो, पत्ता व इतर बाधी मतदार यादीमध्ये तपासून घ्यावीत. ज्यांच्या दुरुस्ती असतील त्यानी दुरुस्ती करुन घ्यावी व ज्यांच्या नागरीकाची नावे मतदार यादीमध्ये नाहीतच अशा सर्व नागरिकांनी ऑनलाईन, बीएलओ व मतदार नोंदणी कार्यालय या ठिकाणी जाऊन आपली नावे मतदार यादीत नोंदवून घ्यावीत, व आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ मध्ये आपण सर्वांनी जास्तीत जास्त मरादान करण्याने राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे असेही जाहीर आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद सोलापूर यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधाम चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात

### प्रा. बनकर यांना 'विद्यावाचस्पती' पिएच. डी पदवी प्रदान

निफाड/प्रतिनिधी : निफाड म हाविद्यालयात कार्यरत असलेले प्रा. महेश



हरिभाऊ बनकर यांना नुकतीच 'मराठी' विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाची पीएचडी पदवी प्राप्त झाली असून, त्यांनी मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील शाहिरी काव्याचा तुलनात्मक अभ्यास राम जोशी - प्रभाकर, अण्णा भाऊ साठे - अमर शेख या विषयावर संशोधन पूर्ण केले. डॉ. महेश बनकर हे पूर्वीच छएढ व डएढ परीक्षा उत्तीर्ण आहेत. त्यांना गाईड म्हणून प्रा.डॉ. अशोक देशमाने यांचे मार्गदर्शन लाभले. बहिस्थ परीक्षक म्हणून प्राचार्य डॉ. वसंत बिरादार तर अध्यक्ष म्हणून डॉ.दासू वैद्य होते. त्याच्या या यशाबद्दल म. वि. प्र. समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ड. नितीन ठाकरे , चिटणीस दिलीप दळवी, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे , संचालक शिवाजी आप्पा गडाख, महिला संचालिका शोभाताई बोरस्ते , निफाड महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.डॉ.सुरेशजी जाधव, माजी प्राचार्य डॉ. ए. के. शिंदे, सर्व प्राध्यापक वृंद आणि आप्तेष्ट नातेवाईक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### बसमध्ये चढताना तरुणाचा मोबाईल पळवला

सोलापूर : रेल्वे स्टेशन बाहेर असलेल्या बस स्टॉप वरुन तेरामैल येथे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने तरुणांच्या खिशामध्ये हात घालून मोबाईल हिसकावून चोरून नेल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. याप्रकरणी नरेंद्र शितलु (वय-३५, रा.मुपो.उमर, अटवा, जि.उन्नाव, राज्य- उत्तर प्रदेश) याने सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोसई.शिंदे हे करीत आहेत.

# इंदापूर तालुक्यात वाळु माफियांचा धुमाकूळ

## महसूल विभागाचे अधिकारी व पोलिसांचे लागेबांधे असल्याची जनतेत जोरदार चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यात भीमा नदीच्या पात्रातून काही मागील अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू साठा करण्यात येत आहे.वाळू माफियांचे कर्दनकाळ म्हणून ओळखले जाणारे तहसीलदार श्रीकांत पाटील यांची बदली झाल्यानंतर इंदापूर तालुक्यात वाळू माफ यांनी त्यांचे डोकेवर काढायला सुरुवात केली आहे. बेकायदेशीर वाळूची चोरी शासनाच्या नियमांना पायदळी तुडवण्याचे काम सर्रासपणे सुरू असून म हसूल विभाग व स्थानिक पोलिसांकडून या वाळू माफियांवर मेहरबानी केल्याचे दिसून येत आहे..

मात्र,वाळू माफियांच्या अवैध वाह-तूक वाळू साठ्यांकडे महसूल विभाग दुर्लक्ष करत असल्यामुळे इंदापुरात महसूल अधिकाऱ्यांची भरली टाळू ही अधिकारी म्हणतात भरा रात्रभर वाळूया उक्तीप्रमाणे





इंदापूर परिसरात राजरोसपणे मोठ्या प्रमाणात अवैध वाळू साठा सुरू आहे. पोलिस प्रशासन, महसूल विभागाच्या 'हितसंबंधामुळे' हा सर्व प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून राजरोसपणे सुरू आहे..असं असताना देखील यातील गंभीर बाब म्हणजे ही वाळू एका बडा नेत्याच्या बंगल्याच्या बांधकामासाठी जात असल्याची चर्चा देखील जोरदार इंदापुरात सुरू आहे.

यामुळे इंदापूरातील हा बडा नेता कोण ही खमंग चर्चा इंदापूर तालुक्यात जोरदार सुरू आहे..जर असे नेते स्वतः च्या स्वार्थासाठी वाळू माफियांना वरदहस्त देत असतील तर ही इंदापूर तालुक्यासाठी गंभीर बाब असल्याची दबक्या आवाजात चर्चा नागरिकांत सुरू आहे.

यामुळे या वाळूतस्करांची प्रशासकीय अधिकाऱ्यांवर देखील हल्ला करण्याची

**शासनाच्या नियमांना पायदळी तुडवण्याचे काम सर्रासपणे सुरू आहे. मात्र महसूल विभाग व स्थानिक पो-लीस प्रशासनाकडून या वाळू चोरांवर अद्याप कुठलीच कारवाई केली जात नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. यातील महत्वाची व गंभीर बाब म्हणजे ही चोरटी वाळू इंदापूर येथील एका बड्या नेत्यांच्या बड्या बंगल्याच्या बांधकामासाठी जात असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे.. तो नेता कोण..हा प्रश्न सर्वसामान्य माणसाला पडला आहे.**

धमक होते, आणि अशातूनच प्रशासकीय अधिकाऱ्यांवर हल्ले होण्याचे प्रमाण वाढत आहे.

यामुळे या वाळू तस्करी ला केवळ हे वाळू चोर जबाबदार नसून या गोष्टीला हा बडा नेता देखील जबाबदार असल्याची माहिती मिळत आहे.

## कुरुंदवाड नगरपरिषद आपत्ती व्यवस्थापन कक्ष, अग्निशमन दल यांच्याकडून मगरीला जीवदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिरोळ/नामदेव निर्मळे : कुरुंदवाड, तालुका शिरोळ येथील श्री दत्त कॉलेज कुरुंदवाड सम ोरील बाजूस श्री किशोर गणपत खांडके यांच्या पार्किंग शेडमध्ये नागरिकांना मगर आल्याची निदर्शनास आले असता.श्री किशोर खांडके यांनी आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन दल कुरुंदवाड नगरपरिषद कुरुंदवाड यांचे कडे फोनवरून सद-रील वर्दी दिली.असता तात्काळ कुरुंदवाड नगर परिषद अग्निशमन दलाचे जवान सर्प मित्र श्री संतोष गणपती पाटील व हेमंत दत्तात्रय वायचळ, फायरमन यांनी संबंधित ठिकाणी सुमारे रात्री १२.३० वाजता पोहोचून जवळपास ३.५ फुटाची जिवंत मगर रेस्क्यू केली. सदरची मगर तात्काळ कुरुंदवाड पोलीस स्टेशन या ठिकाणी हजर करून वनविभाग कोल्हापूर यांना फोनवरून सदर घटनेची कल्पना दिली.

तात्काळ वनविभाग कोल्हापूर वनपाल श्री संजय वसंत कांबळे, वनरक्षक अरुण उत्तम खामकर, वनरक्षक मंगेश रामचंद्र वंजारे यांच्या टीम कडे सद-रची मगर सुस्थितीत ताब्यात देण्यात आली. या



कामी कुरुंदवाड नगरपरिषद अग्निशमन दलाचे नितीन संकपाळ, रमेश शेलारे, करण आलासे, आसरार पटेल,विजय पवार,राहुल खोचरे व हेमंत सावंत तसेच वन्यजीव बचाव पथक प्रदीप सुतार, विनायक माळी, पप्पू खोत यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

तालुका चर्मकार समाजाचे नेते दलितमित्र डॉ अशोकराव माने , डॉ दगडू माने, राजेंद्र माने , आर एस चव्हाण आदि उपस्थित होते . दरम्यान , मंगळवारी १ आक्टोंबर रोजी मुंबई येथे होणारा मोर्चा यशस्वी करण्याचा निर्धार करण्यात आला.

## पंतप्रधान यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील विविध ठिकाणी वाहतूकीत बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नियोजित पुणे दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे होण्याच्या दृष्टिने २६ सप्टेंबर रोजी तात्पुरत्या स्वरूपात विविध ठिकाणी ड्रॉप पॉइंट व पार्किंगची ठिकाणे निश्चित करण्यात आल्याचे आदेश पुणे शहर वाहतूक पोलीस उप आयुक्त कार्यालयाच्यावतीन जारी करण्यात आले आहेत.

पुणे शहरातील दांडेकर पूल ते निलायम ब्रीज (सिंहगड मार्गावर), सावरकर पुतळा ते निलायम ब्रीज, न्यू इंग्लिश स्कूल टिळक मार्ग ते विसावा मारुती, सणस पुतळा चौक ते पूरम चौक, स. प. महाविद्यालय प्रवेशद्वार, नाथ पै चौक ते अलका चौक, अलका चौक ते भिडे जंक्शन व व्हीव्हीआयपी पार्किंग हे ड्रॉप पॉईंट निश्चित करण्यात आले आ-हेत.

शहरातील भिडे पूल नदी पात्र (पावसाच्या परिस्थितीवर अवलंबून), निलायम टॉकीज, पाटील प्लाझा, विमलाबाई गरव-ारे शाळा, न्यू इंग्लिश स्कूल टिळक रोड, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, डी. पी. रोड म्हात्रे पुलाजवळ, कटारिया हायस्कूल, न्यू इंग्लिश स्कूल रमनबाग, मिनर्व्हा पार्किंग मंडई, हरजीवन हॉस्पीटल सावरकर चौक, हमालवाडा पार्किंग व पीएमपीएल मैदान पूरम चौक या ठिकाणच्या जागा पार्किंगसाठी निश्चित करण्यात आल्या आहेत.

समारंभाला येणाऱ्या बसेससाठी डी. पी. रोड कोथरूड व शिवने-री मार्ग, मार्केट यार्ड येथे पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

खंडोजीबाबा चौक-टिळक चौक- सेनादत्त पोलीस चौकी- उजवीकडे वळण घेवून म्हात्रे पूल डावीकडे डी.पी. रोड, सावरकर चौकामधून येणाऱ्या बसेससाठी दांडेकर पुलावरून सरळ राज-ाराम पूल- उजवीकडे वळण घेवून डी. पी. रोड, सिंहगड मार्गावरून येणाऱ्या बसेस दांडेकर पूल- सावरकर पुतळा-मित्रमंडळ चौक- व्होल्गा चौक-सातारा रोड मार्केट यार्ड जक्शन वरून शिवनेरी रोड असे बसेस पार्किंग मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमासाठी येणाऱ्या नागरिकांनी ड्रॉप पॉईंटच्या ठिकाणी उतरावे व त्यांची वाहने निश्चित केलेल्या पार्किंगच्या ठिकाणीच पार्क करावीत, असे आवाहनही पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे.

# नळदुर्ग येथील प्रेक्षणिय डोळे टिपवुन टाकणारा बोरी धरणाचा सांडवा ओसांडून वाहु लागला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनस-ोडे : एक वर्षाच्या प्रदीर्घ दिवसानंतर परत एक बार नळदुर्ग या ऐतिहासिक नळदुर्ग शहरात बोरीधरण १०० % टक्के भरले असून ते बोरी धरणाचा सांडवा ओसंडून वाहत आहे यामुळे नळदुर्गकरां मध्ये आनंदाचे वाता-वरण पसरले आहे हा सांडवा पाहण्यासाठी नळदुर्ग , अणदूर , कारखाना , तुळजापूर आधी ठिकाणहून सांडवा पाहाण्या साठी गर्दी केली होती . सांडवा म्हणजे प्रेक्षकांची डोळे टिपवून टाकणारे दृश्य पर्यटकांना पाहायला मिळाली या पर्यटकांनी मात्र मनमुराद आनंद लुटला एक वर्ष भरात बोरी धरणातला पाणी साठा कमी झाला होता फक्त ६% टक्के पाणीसाठा धरणामध्ये असल्याने नागरिक चिंतेत होते परंतु नळदुर्गकरांवर निसर्गाची कृपा परतीच्या पावसानंतर बोरी धरण मात्र तुडुंब भरले असून निसर्गाचे वरदान नळदुर्ग कराना मिळाले आहे.

**नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले सांडण्याचे जलपूजन , नळदुर्गकर आनंदी**

बोरिधरणाचा सांडवा ओसंडून वाहत असलेला दिसून येत आहे त्यामुळे नागरिकात व पर्यटकात आनंदाचे वातावरण पसरले आहे सांडवा चालू होताच नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्या वतीने जल पूजन करण्यात आले यावेळी नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे , ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे , पत्रकार तानाजी जाधव , पत्रकार लतीफ शेख , माजी



नगर सेवक सुधिर भैया हज-ारे पत्रकार दादासाहेब बनसोडे , पत्रकार मित्र अमर भाळे , पत्रकार भगवंत सुरवसे , शिवाजी नाईक अजित चव्हाण , नळदुर्ग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव ,आधी जणांनी बोरिधरणाच्या सांडव्याचे जल पूजन केले यावेळी इतर पर्यटकांनी सुद्धा मनपुरात आनंद लुटला.

## सांगवी (बु) येथील शालेय समितीच्या अध्यक्षपदी प्रवीण घाटगे आणि उपाध्यक्षपदी तनवीर शेख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील सांगवी (बु) येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या शालेय समितीच्या अध्यक्षपदी प्रवीण घाटगे आणि उपाध्यक्षपदी तनवीर शेख यांनी बहुमताने निवडून आल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

दरम्यान शालेय समितीच्या सदस्य म्हणून आनंदी सुशील जाधव, कल्पना सागर मोरे, नंदिनी काशिनाथ रेड्डी, आकाश सोनकांबळे, स्वाती दत्तात्रय वाघमारे, रूपाली महादेव गायकवाड, दाऊद चाबुकस्वार, आफ्रीन निसार पठाण, मनोज मोरे यांची निवड झाली आहे.

यावेळी माजी सरपंच अबूबकर शेख, तंटाम ुक्त अध्यक्ष प्रदीप सलबत्ते, मुख्याध्यापक पोपट कोरेकर, शिक्षक परमेश्वर किणगे, महावीर येणगुरे,





शरणबसप्पा अष्टगी, अशोक सुतार, श्रीमती चारु-लता पाटील, ज्योती निकाळजे, परवीनबानो मुल्ला व गणेश मोरे, मेजर बाळासाहेब भोसले, प्रवीण बाबर, देविदास रेड्डी, बबन गायकवाड, आकाश सोनकांबळे, पिंटू वाघमारे, निसार पठाण, सागर मोरे, समर्थ घाडगे यांच्यासह आदिजन उपस्थित होते. त्यांच्या या निवडीबद्दल अभिनंदन व कौतुक होत आहे.

**बडोदा येथे संकल्प से संविधान कार्यक्रम** — **केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे प्रतिपादन**

# बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांना भारतरत्न किताब देवून त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बडोदा /प्रतिनिधी : बडोदा संस्थानचेमहाराजासयाजीरावगायकवाड यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणासाठी अनमोल मदत केली. महाविद्यालयीन शिक्षण आणि परदेशातील उच्च शिक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती दिली होती. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य सामाजिक परिवर्तनासाठी लोकसेवेसाठीसर्व देशाला प्रेरणादायी कार्य आहे. त्यांच्या सामाजिक सुधारणाच्या कार्यात महार-ाजा सयाजीराव गायकवाड यांचे ऐतिहासीक योगदान होते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारच्या वतीने महाराजा सयाजीराव गायकवाड यांना मरणोत्तर भारतरत्न किताबाने गौरविण्यात आले पाहिजे यासाठी



आपण प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

बडोदा येथे १०७ व्या संकल्प दिनानिमीत्त संकल्पभुमि सयाजी गार्डन बडोदा येथून जवळ असणा-या सुर्या पॅलेस सयाजी गंज बडोदा येथे संकल्प से संविधान या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ना.रामदास आठवले होते. रिपब्लिकन पक्षाच्या वतीन आयोजित या संकल्प से संविधान कार्यक्रमात बडोदा संस्थानच्या राजम ाता श्रीमंत राजमाता शुभांगिनी राजे गायकवाड यांचा ना. रामदास आठवले यांच्या शुभहस्ते ताम्रपत्र देवुन गौरव करण्यात आला. यावेळी राजमाता शुभांगिनी राजे गायकवाड यांनी महार-ाजा सयाजीराव गायकवाड यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अत्यंत आपुलकीचे संबंध होते. दोघांम ध्ये अनेक पत्र व्यवहार झालेला बडोदा संस्थानात जपून ठेवलेला आहे.

गोलमेज परिषदेत जेव्हा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उत्कृष्ट भाषण केले. त्या गोलमेज परिषदेत महाराजा सयाजीराव गायकवाड

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आणि सयाजीराव महाराज गायकवाडांचे खुप जवळचे संबंध होते. त्यांनी बाबासाहेबांच्या महाविद्यालयीन शिक्षणासाठी मदत केली होती. सयाजीराव महाराज गायकवाड यांनी आपल्या बडोदा संस्थानात अनेक सामाजिक सुधारणा केल्या. सामाजिक सुधारणांचे कायदे केले. शिक्षणाला प्रोत्साहन, वाचन संस्कृतीला प्रोत्साहन यासह अनेक सामाजिक उपक्रम त्यांनी राबविले. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान अनमोल आहे. ऐतिहासीक आहे. त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव आजपर्यंत झालेला नाही. त्यांचे काम केवळ बडोदा संस्थानापुरते नव्हते तर संपूर्ण देशासाठी होते. संपूर्ण देशाला सयाजीराव गायकवाड यांचे जीवनकार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याचा गौरव भारत सरकारच्या वतीने महाराजा सयाजीराव गायकवाड यांना मरणोत्तर भारतरत्न किताब देवून त्यांचा गौरव करण्यात यावा. यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत असे आश्वासन यावेळी ना. रामदास आठवले यांनी श्रीमंत राजमाता शुभांगिनीराजे गायकवाड यांना दिले.**

सुध्दा होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण ऐकल्यानंतर त्यांना खुप अभिमान वाटला. त्यांनी लंडनम धील सर्वात मोठया हॉटेलमध्ये महाम ानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या गौरवासाठी मेजवाणी ठेवली होती. त्या मेजवाणीत त्यांनी लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या पध्दतीने गोलमेज परिषदेमध्ये भाषण केले ते सर्वांना भारावुन टाकणारे होते. त्याची आठवण राजमाता शुभांगिनी राजे गायकवाड यांनी आपल्या भाषणात सांगितली.

भारत सरकारने महाराजा सयाजीराव गायकवाड यांना भार-तरत्न किताब देवून त्यांच्या कार्याचा गौरव केला पाहिजे असे ना. रामदास आठवले यावेळी म्हणाले. यावेळी या कार्यक्रमाचे आयोजक शैलेशभाई शुक्ला, रिपब्लिकन पक्षाचे गुजरात राज्य अध्यक्ष अशोककुमार भट्टी, रिपब्लिकन पक्षाचे गुजरात राज्य प्रभारी जतीनभाई भुट्टा, बडोद्याचे खासदार हेमांग जोशी, महिला आघाडीच्या अध्यक्षा लिलाबेन वाघेला ॲड. प्रविण पारेख, सुर्यकांत वाघमारे (महाराष्ट्र) आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.